
मुल्य १ रू

दैनिक
सोलापूर शहर जिल्ह्यातून वितरित होणारे दैनिक

# सिध्देश्वर नगरी



स्वतंत्र,निष्पक्ष व निर्भीड दैनिक

dainik.siddheshwarnagari.com
Email:dailysiddheshwarnagari@gmail.com

* सोलापूर * वर्ष : ३ * अंक : २४ * पाने : ४ * बुधवार,२८ जानेवारी २०२६ RNI NO : MAHMAR52944

## गोव्यातही १६ वर्षाखालील मुलांना सोशल मीडिया वापरास येणार बंदी






**नवी दिल्ली :** सोशल मीडिया हा केवळ प्रौढांसाठी नाही तर तरुणांसाठी ही सध्या घातकी ठरताना दिसतो आहे. सोशल मीडियाच्या हाती आहारी गेल्याने अनेक तरुण–तरुणींची आयुष्य उध्वस्त झाल्याची अनेक उदाहरणे आपल्या समाजात दिसून येतात. त्या पार्श्वभूमीवर ऑस्ट्रेलिया आंध्र प्रदेश नंतर आता गोव्यातही सोळा वर्षाखालील मुलांना सोशल मीडिया वापरावर बंदी आणण्यासाठी सरकार गंभीरपणे विचार करत असून अधिवेशनापूर्वी या संदर्भातील घोषणा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

सोळा वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घातली जाऊ शकते का? याचा अभ्यास सध्या गोव्या सरकार करत असून राज्याचे पर्यटन आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री रोहन खवंटे यांनी याबाबत सध्या विचार सुरू असल्याचे म्हटलेला आहे.

कृत्रिम बुद्धीमत्तेच्या (एआय) काळात मुलांनी यावर अधिक लक्ष देण्याची गरज आहे. उत्तम नागरिक निर्माण व्हावेत आणि पुढे जाऊन त्यांनी राज्य आणि देशाची योग्य काळजी घ्यावी. आजकाल मुल सतत मोबाईल फोन वापरत असतात. सातत्याने सोशल मीडियाचा वापर करत असतात, जेवण करताना असो किंवा टीव्ही पाहताना पालकांसोबत असतानाही ते मोबाईल वापरत असतात'', असे खंवटे म्हणाले.

आंध्र प्रदेश आणि गोवा या दोन्ही राज्यांनी यासाठी ऑस्ट्रेलियाने सोशल मीडियाशी निगडित नव्याने केलेल्या कायद्याचा अभ्यास करत असल्याचे सांगितले आहे. सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे मुलांच्या जीवनावर जे परिणाम होत आहे त्याबद्दल अनेक तक्रारी आमच्याकडे प्राप्त झाले असून सोशल मीडिया आणि काही इतर प्लॅटफॉर्म मुलांचे लक्ष विचलित करत आहेत अशी माहिती मंत्री खंवटे यांनी रविवारी बंदी बाबत बोलताना दिली. सरकारचा हा विचार झाल्यानंतर मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्याशी चर्चा करून शक्य असल्यास राज्यात १६ वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडियावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला जाईल असे मंत्री रोहन खंवटे म्हणाले.

आयटी विभागातील लोक याचा अभ्यास करत असून येत्या काही दिवसात कदाचित पुढच्या अधिवेशनापूर्वी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून याबाबत अधिकृत घोषणा केली जाईल असे त्यांनी सांगितले.''मुलांनी शिक्षण आणि तंत्रज्ञान संबधित शिक्षणावर अधिक लक्ष द्यावे, असा आमचा उद्देश आहे'', असे खंवटे यांनी याबाबत भूमिक स्पष्ट करताना सांगितले.

## जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतही घराणेशाहीचा बोलबाला

**सोलापूर :** निवडणुकीत आता घराणेशाहीला थारा देता कामा नये असे भाजप आणि त्यांचे नेते मंडळी वारंवार सांगत असताना सोलापूर जिल्ह्यातील महापालिकेनंतर आता जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतही घराणेशाहीचा बोलबाला दिसून आलेला आहे. सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यातील सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील मंडळींनी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत आपलेच नातेवाईक भाऊ–बहीण व इतरांना उभे करून जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत घराणेशाहीचा चुणुक दाखवून दिलेली आहे.



महानगरपालिका निवडणुकांची रणधुमाळी संपलीनंतर लगेच राज्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरु झाली आहे. यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची कालची शेवटची तारीख होती. या निवडणुकांसाठी अनेक राजकीय नेत्यांनी आपली पुढची पिढी राजकारणात आणली आहे.

या निवडणुकांमध्ये देखील घराणेशाही दिसत आहे. सोलापूर जिल्ह्यात कुठे कुठे राजकीय नेत्यांनी आपल्या नातेवाईकांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे, याबाबतची माहिता पाहुयात.

माळशिरस तालुक्यात शरद पवार गटाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांचे चुलत बंधू अर्जुनसिंह मोहिते पाटील आणि वहिनी वैष्णवी देवी मोहिते पाटील या शरद पवार गटाकडून निवडणुकाच्या रिंगणात आहेत. तसेच माळशिरस विधानसभा मतदारसंघाचे शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर यांचे पुत्र जीवन जानकर व कन्या ज्योती जानकर निवडणूक रिंगणात आहेत. तसेच माळशिरस मधूनच भाजपचे माजी आमदार राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते या भाजपकडून दहिगाव जिल्हा परिषद गटातून निवडणुकीच्या रिंगणात आहेत. सांगोला तालुक्याचे माजी विधान परिषद आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांचे पुत्र यशराज साळुंखे पाटील हे जवळा जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवत आहेत.

मंगळवेढा तालुक्यातील लक्ष्मी दहिवडी जिल्हा परिषद गटातून माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांची कन्या कोमल या शरद पवार गटाकडून जिल्हा परिषद निवडणूक लढवीत आहेत. दिवंगत माजी आमदार दिगंबर बागल यांच्या कन्या रश्मी बागल कोलते या भाजपकडून निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत.पंढरपूरमधून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते कल्याणराव काळे यांच्या वहिनी मोनिका समाधान काळे यांनी भाजपमध्ये प्रवेश करून वाखरी जिल्हा परिषद गटातून उमेदवारी दाखल केली आहे.

माजी दिवंगत आमदार भारत भालके यांचे पुतणे व्यंकटराव भालके हे गोपाळपूर गटातून तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक रिंगणात उतरले आहेत. कुरुल जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील स्वतः उमेदवार आहेत. तर नरखेड जिल्हा परिषद गटातून त्यांचे बंधू संतोष पाटील निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

## मुख्यमंत्र्याच्या पत्नीबाबत गलिच्छ वक्तव्य करणाऱ्या अंजली भारतीला अटक करा

### अमृता फडणवीसांवरील वक्तव्य भोवणार, भाजप आक्रमक



**नागपूर :** स्त्री ही स्त्रीचे शत्रू खरंच असते की काय असे आता वाटू लागले आहे. कारण तथाकथित गायिका अंजली भारती हिने काल एका कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नीबद्दल जे गलिच्छ, आक्षेपार्ह आणि घाणेरडे वक्तव्य केले त्याचा आता संपूर्ण महाराष्ट्रातून तीव्र शब्दात निषेध व्यक्त होताना दिसतो आहे.

तिच्या घाणेरड्या वक्तव्यानंतर आता भाजप आक्रमक झालेला असून गायिका अंजली भारती हिच्या विरुद्ध मीरा–भाईंदर भाजप महिला आघाडी जिल्हाध्यक्ष वैशाली भोईर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह कनकिया पोलीस ठाण्यात जाऊन लेखी तक्रार दाखल केली आहे तसेच

महिलांचा अवमान करणाऱ्या वर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे आणि जोपर्यंत तिला अटक होत नाही तोपर्यंत भाजप शांत बसणार नसल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. भंडारा जिल्ह्यातील फुलमोगरा येथे झालेल्या मेळाव्यात कथित गायिका अंजली भारतीची जीभ घसरली होती आणि लातूरच्या अल्पवयीन मुलीवरील बलात्काराच्या घटनेचा उल्लेख करताना अंजली भारती यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या संदर्भात अत्यंत आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आता राज्यातील राजकीय पक्षाच्या महिलांकडून अंजली भारतींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. तसेच, भाजप महिला आघाडी आकमक बनली नसून मीरा भाईंदरमध्ये गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे.

## झेडपी अन् पंचायत समितीतही मतदानापूर्वीच महायुतीचे २२ उमेदवार बिनविरोध

**मुंबई :** महापालिका निवडणुकीत महायुतीचे महाराष्ट्रात अनेक उमेदवार हे बिनविरोध निवडून आलेले होते. या बिनविरोधाला राज्यातील विरोधी पक्षांकडून जोरदार विरोध होत होता परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमच्या उमेदवारांच्या बिनविरोधाने तुम्हाला मिरची लागली तर आम्ही काही करू शकत नाही असे शब्दात विरोधकांच समाचार घेतलेला होता. महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीनंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका समीप आलेल्या आहेत.

या निवडणुकांतही महायुतीने बिनविरोधाच्या पॅटर्न कायम ठेवलेला असून राज्यातील १५ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितीच्या निवडणुकांच्या अंतिम लढतीचे चित्र काल स्पष्ट झाले असून मतदानापूर्वीच काहींनी बिनविरोध होत विजयाचा गुलाल उधळलेला आहे. राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा काल शेवटचा दिवस होता मात्र तत्पूर्वीच काहींनी विजयाचा गुलाल उधळला ज्यामध्ये कोकण अग्रेसर राहिला असून कोकणात महायुतीने विजयी खाते उघडत तळपणात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत आधीच



महायुतीचे तब्बल २१ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

त्यामध्ये रायगड जिल्ह्याच्या महाड पंचायत समिती निवडणुकीत सवाने धामणे गणातून उभे असलेले अनिल जाधव बिनविरोध आल्याने महायुतीचे एकूण २२ उमेदवार बिनविरोध झाले आहे त्यामुळे सिंधुदुर्ग रायगड मध्ये ही महायुतीने विजयाचा आनंद साजरा केला. सिंधुदुर्ग जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत भाजपने १९ तर शिंदे सेनेने २ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे, मतदानापूर्वीच या उमेदवारांनी विजयाचा गुलाल उधळला.

येथील पंचायत समितीमध्ये बिडवाडी पंचायत समिती संजना राणे, वरवडे पंचायत समिती सोनू सावंत, कोकीसरे पंचायत समिती साधना नकाशे, पडेल पंचायत समिती अंकुश ठूकरूल, नाडण पंचायत समिती गणेश राणे, बापर्डे पंचायत समिती संजना लाड, नाटळ पंचायत समिती सायली कृपाळ, नांदगाव पंचायत समिती हर्षदा वाळके, शिरगाव पंचायत समिती शीतल तावडे, फणसगाव पंचायत समिती समृद्धी चव्हाण, जाणवली पंचायत समिती महेश्वरी चव्हाण, आडवली मालडी पंचायत समिती सीमा परुळेकर, आसोली पंचायत समिती संकेत धुरी हे भाजपचे उमेदवार बिनविरोध झाले आहेत. तर कोळझर पंचायत समितीमध्ये शिंदेंच्या शिवसेनेचे गणेशप्रसाद गवस उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

यात उबाठा सेनेच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने हे उमेदवार बिनविरोध झाले आहेत. दोडामार्ग तालुक्यातील कोलझर पंचायत समिती महायुतीचे उमेदवार गणेशप्रसाद गवस बिनविरोध. ठाकरे शिवसेनेचे प्रवीण परब यांनी माघार घेतल्याने गणेशप्रसाद गवस निवडून आले आहेत. गवस हे शिंदेंच्या शिवसेनेचे दोडामार्ग तालुकाप्रमुख म्हणून काम पाहत असून कोलझर पंचायत समितीमधून ते बिनविरोध निवडून आले आहेत.

## मुंब्र्यासह हा देश व महाराष्ट्र तिरंगा आहे

### नूतन नगरसेविका सहर शेख यांचे वक्तव्य बालिशपणाचे; जितेंद्र आव्हाडांचे प्रत्युत्तर



**मुंबई /ठाणे :** मुंब्र्यात आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते, या सोहळ्यापूर्वी मुंब्रातील रॅलीत आव्हाड यांनी संवाद साधला. कोण आया, कोण आया... शेर का शिकारी आया, अशा घोषणा जितेंद्र आव्हाड आले असता देण्यात आल्या आहेत. यावेळी संपूर्ण मुंब्रा हिरवा करू या मुंब्र्यातील नूतन नगरसेविका सहर शेख यांचे वक्तव्याला एवढे महत्त्व देण्याची आवश्यकता नाही

तसेच मुंब्रासह महाराष्ट्र आणि देशाचा रंग फक्त तिरंगा आहे त्यामुळे दुसऱ्या कोणत्याही रंगाचे लेबल तुम्ही इथे लावू शकत नाही अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जितेंद्र आव्हाड यांनी प्रतिक्रिया दिलेली आहे. विजयानंतर मुंब्रा येथे एमआयएमने जिंकलेल्या ५ जागा लक्षवेधी ठरल्या. एमआयएमच्या नवनिर्वाचित नगरसेवक सहर शेख यांनी केलेल्या भाषणाची सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगली. तसेच, जितेंद्र आव्हाड यांना उद्देशून कैसा हराया.. असं वक्तव्यही तुफान व्हायरल झालं होतं. यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पहिल्यांदा प्रतिक्रिया दिली.

तसेच, एक लहान मुलगी म्हणत तिचे वक्तव्य बालिशपणाचे असल्याचेही आव्हाड यांनी स्पष्ट केले. तसेच, मुंब्रा तिरंगा है, हा देश तिरंगा आहे, हा महाराष्ट्र तिरंगा आहे आणि मुंब्रा तिरंगा आहे. संविधानाने तिरंगा रंग दिलाय, तुम्ही कुठल्याही एका रंगाची मोनोपॉली या देशात आणू शकत नाही. मुंब्रा हा तिरंगा आहे, इथे तिरंगाच राहणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. एखादी लहान पोरगी मिश्किलपणाने बोलते तर तिचं फार म्हणजे सोशल मीडियावरती तिच्या बालिशपणाची क्रेझ आहे, तिच्या त्या वक्तव्याला खूप काही अर्थ नाही. म्हणजे माझी लहान पोरगी हसत हसत म्हटली... चॉकलेट लाया.. तर तेही गाजेल त्यात काय विशेष नाही, असा पलटवार जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं. तसेच, हाथी चले अपली चाल, कुत्ते भोके हजार म्हणत एमआयएमच्या विजयावर बोलताना आव्हाड यांनी प्रतिक्रिया दिली.

## मोबाईल शुटींगवरुन वाद, कॉलेजमधील युवकाने दुसऱ्या मित्राला भोसकले



**सोलापूर :** सांगोला तालुक्यातील कोळे येथे प्रजासत्ताकदिनी कार्यक्रम संपल्यानंतर मोबाईलवर चित्रीकरणाच्या कारणावरून १२ वीच्या दोन विद्यार्थी मित्रांमध्ये झालेल्या वादातून एका मित्राने आपल्याच विद्यार्थी मित्राच्या पोटात चाकूने भोसकून त्यास जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला

हा धक्कादायक प्रकार सांगोल्यातून समोर आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली असून आरोपींना ७ दिवसांची पोलीस () कोठडी सुनावण्यात आली आहे.

त्यामध्ये जखमी झालेल्या विद्यार्थ्याला सांगली येथे उपचारासाठी हलविण्यात आले. सांगोला तालुक्यातील कोळे येथे प्रजासत्ताकदिनी कार्यक्रम संपल्यानंतर हा धक्कादायक प्रकार घडला. यावेळी विद्यार्थ्यांच्या ओरडण्याचा आवाज ऐकून त्याच्या पोटात चाकू तसाच ठेवून दोघांनी तेथून धूम ठोकली. फिर्यादी, सुभाष आलदर यांचा मुलगा युवराज व त्याचा मित्र शंकर घाडगे हे दोघेही बारावीच्या एकाच वर्गात शिक्षण घेतात. युवराज हा प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण व सांस्कृतिक कार्यक्रमाकरिता शाळेवर आला होता . यावेळी प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम संपल्यानंतर विद्यार्थी – विद्यार्थिनी शाळेच्या गेटमधून आपापल्या घराकडे निघाले होते .

अचानक शंकर याने शाळाबाह्य समाधान होनमाने यास बोलवून युवराज यास शिवीगाळ दमदाटी करुन' तू मोबाईलवर कोणाचे चित्रीकरण केले ' याचा जाब विचारत सोबत आणलेला चाकू दोघांनी मिळून युवराज याच्या पोटात भोसकून त्यास जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. नातेवाईकांनी युवराज याच्या पोटात भोसकलेल्या चाकूसह त्यास तातडीने उपचारा करता सांगली येथील खाजगी रुग्णालयात हलवले.

दरम्यान, या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत पुजारी करीत असून प्रजासत्ताक दिनीच घडलेल्या या धक्कादायक प्रकारामुळे मुलांमध्ये मात्र घबराटीचे वातावरण आहे.

दरम्यान जखमी विद्यार्थ्यावर सांगली येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. ही घटना सोमवारी प्रजासत्ताक दिनी सकाळी ९ च्या सुमारास शाळेच्या गेटसमोर घडल्याने विद्यार्थ्यांमधून भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.युवराज सुभाष आलदर (वय –१९ रा. कोळे नाथबाबा वस्ती ता. सांगोला ) असे जखमी विद्यार्थ्याचे नाव आहे. याबाबत, वडील सुभाष सदा आलदर यांनी फिर्याद दिली असून पोलिसांनी शंकर मारुती घाडगे ( रा. कोळे ) समाधान श्रीमंत होनमाने (रा. जुनोनी ता सांगोला ) दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

दरम्यान, घटनेनंतर पोलिसांनी दोघांना शिताफीने अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोघांना सात दिवसाची पोलीस कोठडी दिल्याचे पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत पुजारी यांनी सांगितले आहे.



## अंधश्रद्धा ही केवळ धार्मिक समस्या नव्हे

भारतीय समाजाच्या इतिहासात अंधश्रद्धा ही केवळ धार्मिक समस्या राहिलेली नाही; ती सत्ता, अर्थकारण आणि मानसिक गुलामी यांचे सर्वात प्रभावी साधन बनली आहे. विज्ञान, शिक्षण आणि लोकशाही यांच्या युगातही बुवाबाजी टिकून आहे, याचा अर्थ समाजाने आधुनिकतेचा स्वीकार केला असला तरी विवेकाचा स्वीकार केलेला नाही. विदर्भातील विक्तूबाबा ही केवळ एका व्यक्तीची कथा नाही; ती संपूर्ण समाजाच्या वैचारिक अपयशाची आरसेदर्शी कहाणी आहे. विदर्भातील मोठ्या बाबांपैकी एक म्हणजे विक्तूबाबा. नागपूर जिल्ह्यात त्याचे भव्य देवस्थान उभे आहे. आज हे देवस्थान कोट्यधीश बनले आहे. पण या देवस्थानामागील वास्तव वेगळे आहे. वास्तविक पाहता विक्तूबाबा हा मानसिकदृष्ट्या अपंग मुलगा होता.

वयात आल्यानंतर स्त्रिया दिसल्या की चावायला धावायचा; म्हणून त्याच्या नातेवाईकांनी त्याच्या हातापायात बेड्या घातल्या. हाच पुढे ''बेडीवाले-विक्तूबाबा'' म्हणून प्रसिद्ध झाला. दलित समाजामध्ये या बाबाला फार मानाचे स्थान मिळाले आणि प्रचंड जनसमुदाय त्याच्यावर श्रद्धा ठेवू लागला. एका मानसिकदृष्ट्या अपंग व्यक्तीला देवत्व देणे, त्याच्या विकृतीला चमत्काराचे रूप देणे आणि त्याच्या नावावर कोट्यवधी रुपयांचे देवस्थान उभे राहणे हे श्रद्धेचे नव्हे, तर विवेकाच्या पराभवाचे लक्षण आहे. समाजाने जेव्हा प्रश्न विचारणे थांबवले, तेव्हा बुवाबाजी जन्माला येते. बुवाबाजी ही अंधश्रद्धेची आधुनिक आवृत्ती आहे. ती देवाच्या नावाने नव्हे, तर माणसाच्या नावाने चालते म्हणूनच ती अधिक धोकादायक आहे. बुद्धांचा विचार याच बुवाबाजीच्या मुळावर घाव घालणारा आहे.

बालपणी मी स्वतः विक्तूबाबाला पाहिले आहे. सतत घाणेरड्या शिव्या देणारा, हातापायात बेड्या असणारा हा बाबा; ज्याच्या भोवती भक्तांचा गराडा असायचा. त्याच्या प्रत्येक पागल हावभावाचा भक्त आपापल्या परीने अर्थ काढायचे. मोठ्या प्रमाणावर पेढे, नारळ, पैसे बाबाला वाहिले जायचे आणि त्याच वस्तू पुन्हा दुकानांत विक्रीला ठेवण्यात यायच्या. टी.बी., महारोग आणि कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचे रुग्णही विक्तूबाबाकडे येताना मी पाहिले. त्यांच्या नातेवाईकांशी संवाद साधल्यावर ''बाबाच्या कृपेने रोग बरे होतात'' हा केवळ विश्वास नव्हे, तर अनुभव असल्याचा दावा ऐकून मी स्तब्ध झालो. कारण विक्तूबाबांची आई महारोगाची रुग्ण होती आणि ती बाबा आमटेंच्या दवाखान्यात दीर्घकाळ उपचार घेत होती. विक्तूबाबाच्या घाणेरड्या शिव्यांतूनही ''चांगला अर्थ'' काढण्याचा भक्तांचा अट्टाहास विलक्षण होता. काही भक्त तर मुद्दाम बाबाला त्रास देत, जेणेकरून त्याने शिव्या द्याव्यात. त्या शिव्या मोजून काही लोक सट्टा-

जुगार लावत असत. हा प्रकार केवळ हास्यास्पद नव्हे, तर समाजाच्या मानसिक अधःपतनाचे प्रतीक होता. आजही काही लोक लग्नाची पत्रिका समाजात वाटण्यापूर्वी विक्तूबाबाच्या चरणी ठेवतात. हा केवळ श्रद्धेचा प्रश्न नाही; तो मानसिक गुलामीचा पुरावा आहे. जीवनातील प्रत्येक निर्णय स्वतःच्या बुद्धीने घेण्याऐवजी बाबाच्या आशीर्वादावर अवलंबून राहणे म्हणजे विवेकाचा त्याग होय.

बुद्धाने सांगितले ''अत्त-दीप-भव'', म्हणजे स्वतःचा दिवा व्हा. पण आजचा समाज म्हणतो, ''बाबाचा दिवा व्हा.'' हा फरक केवळ शब्दांचा नाही; तो मानसिकतेचा आहे. बुद्धधम्माचा अर्थ देव बदलणे नव्हे, तर विचार बदलणे आहे. जो समाज बुद्धाचा धर्म स्वीकारूनही चमत्कार शोधतो, तो बुद्धाचा नाही, तर बुवांचा अनुयायी ठरतो. म्हणूनच बुवाबाजी ही केवळ धार्मिक समस्या नाही; ती बुद्धविचाराच्या पराभवाची चिन्हे आहेत. जर बुद्धाचा विचार खरोखर स्वीकारायचा असेल, तर बुवाबाजीला केवळ विरोध करणे पुरेसे नाही; तिच्या मुळावरच घाव घालावा लागेल. कारण बुद्धाचा मार्ग स्पष्ट आहे, श्रद्धेपासून विवेकाकडे, देवापासून मानवाकडे आणि चमत्कारापासून विज्ञानाकडे. बुद्धाने देव, चमत्कार आणि अंधश्रद्धा यांना थेट आव्हान दिले. ''कोणत्याही गोष्टीवर केवळ परंपरेमुळे, धर्मामुळे किंवा कोणाच्या सांगण्यामुळे विश्वास ठेवू नका; स्वतःच्या बुद्धीने तपासून पाहा'' हा बुद्धाचा मूलमंत्र होता. त्यामुळे बुद्धधम्म हा पूजा, कर्मकांड किंवा बाबागिरीचा धर्म नाही, तर विवेक, अनुभव आणि तर्काचा धर्म आहे. बुद्धाने सांगितले की दुःखाचे कारण बाहेर नाही; ते आपल्या आत आहे. त्यामुळे दुःखावर उपाय शोधताना देव, बाबा किंवा चमत्कार शोधण्याची गरज नाही; गरज आहे ती स्वतःच्या बुद्धीची. विडंबन असे की बुद्धधम्म स्वीकारलेल्या समाजातच बुवाबाजी फोफावली आहे. बुद्धाच्या नावाने धर्म स्वीकारणारा समाज बाबांच्या चरणी नतमस्तक होतो ही केवळ विसंगती नाही; ती बुद्धविचाराची विटंबना आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला केवळ अधिकार दिले नाहीत; त्यांनी त्याला विचार करण्याची शक्ती दिली. बाबासाहेबांचा धर्म हा देवाचा नव्हे, तर माणसाचा धर्म होता. बुद्धधम्म स्वीकारताना त्यांनी स्पष्ट सांगितले, ''श्रद्धा नव्हे, बुद्धी.'' त्यांनी अंधश्रद्धा, कर्मकांड आणि देववाद यांना स्पष्ट नकार दिला. पण आज प्रश्न उभा राहतोआपण बाबासाहेबांचे अनुयायी आहोत की त्यांच्या नावावर जगणारे भक्त? हजारो घरांमध्ये बाबासाहेब आंबेडकर आणि विक्तूबाबांचे फोटो शेजारी लावलेले दिसतात. हा केवळ प्रतीकात्मक विरोधाभास नाही; तो वैचारिक शून्याचा पुरावा आहे. दीक्षाभूमी ही केवळ भूभाग नाही; ती विवेकाची क्रांती आहे. ज्या भूमीवर बाबासाहेबांनी लाखो लोकांना अंधश्रद्धेपासून मुक्त केले, त्याच भूमीवर विक्तूबाबाचा सत्कार होणे म्हणजे बुद्धिवादाची सार्वजनिक हत्या आहे. याविरोधात मोजकेच बुद्धिवादी आवाज उठले; बहुसंख्य आंबेडकरी नेते मात्र गप्प राहिले. का? कारण भक्तांचा रोष, मतांचा तोटा आणि राजकीय नुकसान. इथे प्रश्न उभा राहतो राजकारणासाठी विवेकाचा बळी देणे ही आंबेडकरी चळवळ आहे का? जर हो, तर बाबासाहेबांचा विचार केवळ निवडणूक घोषणापत्रापुरता मर्यादित राहिला आहे, हे स्वीकारावे लागेल.

दैनिक सिध्देश्वर नगरी
www.dainiksiddheshwarnagari.com
Email:dailysiddheshwarnagari@gmail.com

वार्ताहर नेमणे आहेत

अल्पावधीतच वाचकांच्या पसंतीस उतरलेले व सोलापूर शहर जिल्ह्यातून वितरित होणाऱ्या नामांकित दैनिकासाठ खालील तालुक्याच्या ठिकाणी वार्ताहर नेमणे आहेत

* मोहोळ * अक्कलकोट * बार्शी
* सांगोला *पंढरपूर * अकलूज

पात्रता : * कोणत्याही शाखेचा पदवीधर
* मराठी भाषेवर प्रभुत्व
* पत्रकारिता क्षेत्रातील अनुभव असल्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल

* आपल्या जीवनाला नवी दिशा देण्याची ही एक सुवर्णसंधी आहे..

तरी इच्छुकांनी अधिक माहितीसाठी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा

9145612870 / 9175596747

# हलक्या कानाचे नि वाईट मनाचे होऊ नका...



आजकाल आपण सगळे मिळून हलक्या कानाचे बनलो आहोत. आपल्या भल्यासाठी घरातील नातेवाईक रागाने बोलले की लगेच त्यांच्या बद्दल मनात घृणा निर्माण होत आहे आणि बाहेरच्या परक्या लोकांनी त्यांच्या स्वार्थासाठी आपली खोटी स्तुती केली की तेच आपले हितचिंतक वाटतात.अशा या मानसिक स्थितीमुळे घरातील नातेवाईक परके वाटायला लागले आहेत आणि बाहेरचे परके लोक जीवाभावाचे मित्र वाटत आहेत.हे सगळं घडत आहे केवळ आपण सगळे हलक्या कानाचे बनून स्वार्थ साधण्यासाठी धडपड करत आहोत,वाईट मनाला सैरभैर पळू देत आहोत.

सध्या जिकडे तिकडे हलक्या कानाचे बनण्याचे प्रमाण वाढले आहे.कोणी काही हळूच सांगितले की त्यावर लगेच विश्वास ठेवून मनात वाईट भावना आणून प्रतिक्रिया दिली जात आहे.काही व्यक्ती आपल्या चुका झाकून ठेवतात आणि दुसऱ्यांच्या चुका अतिशयोक्ती अलंकारात नटवून सांगतात.बहुतांश घरातील सासू व सुना दोघीही हलक्या कानाच्या बनून एकमेकींना पाण्यात पाहत आहेत. शेजारच्या बायकांनी दोघींचे जरा कान भरले की लगेच दोघीही एकमेकींना भांडताना थकत नाहीत.एकेकाळी जीवाभावाचे असणारे दोन सखखे भाऊ त्यांच्या पत्नींनी कान भरले की दोघे सख्खे भाऊ भांडायला तयार असतात.ते भांडण घरापुर्ते मर्यादित न राहता कोर्टात जाऊन धडकलेले असते. एकाच ऑफिसात नोकरी करणारे कर्मचारी सतत एकमेकांचे कान भरून भांडणे लावून स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करतात. काहीजण बॉसच्या किंवा वरिष्ठांच्या कानात हळूच कुजबुज करतात आणि सगळे वातावरण बिघडून टाकतात.अशा गढूळ वातावरणामुळे सुख कोणालाही लाभत नाही. खरेतर सर्वांनी मिळून मिसळून राहणे व आपापली ड्युटी प्रामाणिकपणे करणे अपेक्षित असते.


परंतु,काही कार्यालयातील कर्मचाऱ्यांना किंवा नोकरदारांना आपापसात भांडणे लावण्याचा छंद जडलेला असतो. कधी कधी ही भांडणे पार विकोपाला जातात आणि सर्वांना संकटात ढकलून मोकळे होतात.

सध्या असे वातावरण तयार करण्यात आले आहे की लोक एकमेकांच्या विरोधात काहीबाही बोलून आणि हलक्या कानाचे बनून सुख,समाधान व शांतता हरवून गेले आहेत.त्यामुळे बहुतांश लोक तणावात जीवन जगत आहेत. समाजातील, गावातील आणि प्रत्येक घरातील वातावरण आनंदी राहीलेले नाही.लोक लहान लहान गोष्टींवरून हमरीतुमरीवर येत आहेत. वाद होऊन त्याचे मोठ्या भांडणात रुपांतर होत आहे. खून खराबा होत आहे. हे कुठेतरी थांबायला हवे. स्वत:च्या स्वार्थासाठी लोकांचे कान भरणे अगोदर बंद झाले पाहिजे.काही लोकांना त्यांच्या संपत्तीचा फार गर्व असतो. काहींना त्यांच्या पदाचा गर्व वाटतो आणि काहींना मात्र बिनकामाच्या जातीचा फार गर्व असतो.म्हणून हे गर्विष्ठ लोक दुसऱ्यांचे कान भरण्यासाठी आसुसलेले असतात.आणि म्हणून अशा लोकांमुळे जिकडे तिकडे वाद विवाद होत आहेत.आणि कौटुंबिक,सामाजिक व मानवी सौख्य हरवत चालले आहे.

त्यामुळे आपण सर्वांनी हलक्या कानाचे बनने व कोणी आपले कान भरण्याचा प्रयत्न केला तर आपण सावध होऊन कान भरवून घेणे बंद केले पाहिजे.कान आपले,मन आपले आणि दुसऱ्यांच्या बोलण्यावर उतावीळ होऊन विश्वास का ठेवायचा?सत्य व असत्य जाणून न घेता तिखट प्रतिक्रिया देणे सर्वांनी बंद केले पाहिजे.म्हणून सावध व्हा,सजग व्हा.हलक्या कानाचे बनू नका आणि वाईट मनाचे अजिबात बनू नका.

**बबन दामोदर गुळवे, लातूर**
**९७३०९३९७३२.**

# बालपणीही धर्माची लाज राखणारे लाला लजपतराय !



भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात गाजलेली त्रयी म्हणजे लाल-बाल आणि पाल. यातील पहिले लाल म्हणजे लाला लजपतराय. २८ जानेवारी १८६५ मध्ये जन्मलेल्या लाला लजपतराय यांनी स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान दिले. १८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसचीं स्थापना करण्यातही त्यांची भूमिका महत्वाची होती. स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाबद्दल त्यांना 'पंजाब केसरी' ही पदवी देण्यात आली होती.

आर्य समाजाच्या माध्यमातून त्यांनी अनेकांमध्ये देशप्रेमाची ज्योत जागवली. लाला लजपतराय यांचे वडील शिक्षक होते. एकदा हिंदु धर्माबद्दल त्यांच्या मनात विकल्प निर्माण झाले आणि त्यांनी मुसलमान बनण्याचा निर्णय घेतला.

इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी मशिदीच्या पायऱ्या चढत असतांना मागे त्यांची पत्नी छोट्या बाळाला कडेवर घेऊन रडत रडत पतीला मागे फिरण्यासाठी आणि मुस्लिम धर्म न स्वीकारण्यासाठी विनवण्या करत होती; पण लाला लजपतराय यांच्या वडिलांनी मुसलमान धर्म स्वीकारण्याचा निर्णय निश्चित केला होता.

त्याच वेळी त्यांच्या पत्नीच्या कडेवर असलेले बाळ इतक्या मोठ्याने रडायला लागले की, आता त्याचे प्राण जातील कि काय, असे वाटू लागले. लाला लजपतराय यांच्या वडिलांना मशिदीत घेऊन जाणाऱ्या मुसलमानाने सांगितले, प्रथम मुलाला वैद्याकडे घेऊन जा. त्याच्यावर उपचार करा आणि नंतर मशिदीत या. बाळाला वैद्याकडे घेऊन गेल्यावर ते लगेच गप्प झाले. त्याला काहीही झाले नसल्याचे वैद्यांनी सांगितले.

त्यानंतर लाला लजपतराय यांच्या वडिलांचे मुसलमान धर्म स्वीकारणे स्थगित झाले. बाळाच्या नामकरण विधीच्या वेळी आईने बाळाचे नाव लाजपतराय ठेवण्यास सांगितले. पंजाबमध्ये 'पत' या शब्दाचा अर्थ 'धर्म' असा आहे. बाळाने धर्माची लाज राखली; म्हणून त्याचे नाव लाजपतराय ठेवले आणि मोठा झाल्यावर हाच मुलगा वैदिक हिंदू धर्माचा प्रसार करणारा आर्य समाज आणि भारत देश यांचा थोर नेता बनला.

**जगन घाणेकर,मुंबई**
**९६६४५५९७८०**

# आदर्श नागरिकत्वाचे पैलू न वापरता जयघोषही करणे योग्य नाही

आम्ही आमच्या झेंड्याची शान राखतो.त्यासाठी झटतो. त्याची आठवण राहावी म्हणुन पंधरा ऑगष्ट,सव्वीस जानेवारी साजरा करतो.नव्हे तर या दिवशी देशात देशभक्तीचं वातावरण तयार करतो.

'भारत माता की जय' 'तिरंगी झेंडे की जय'अशा जयघोषात आमचे राष्ट्रभक्तीचे वारे तयार होतात.प्रत्येक शाळेशाळेतुन मग मिरवणुक काढली जाते.मग ती मिरवणुक एका ठिकाणी थांबवली जाते.तिथे वक्त्यांची भाषणे होतात.ते वक्ते मुलासमोर भाषणे देतात.यात काही बडेजाव शब्दही बोलतात.

वक्ते पाहता ते इमानदार असतातच असे नाही.काही बेईमानही असतात.पण तरीही आपले हेवेदावे सोडून ही मंडळी देशासाठी स्वातंत्र्याचं वातावरण विद्यार्थ्यात निर्माण करुन एकप्रकारे देशाला आदर्श नागरिक देण्याचे काम करतात. स्वतः कसेही वागो,तेवढं चांगलं भाषण देण्याचं काम करतात.मग विद्यार्थ्यांना खावू वाटप होतो.

'विजयी विश्व तिरंगा प्यारा.झंडा ऊँचा रहे हमारा'खरंच आम्हाला जसा आमचा देश प्यारा आहे.तसा आम्हाला आमचा राष्ट्रध्वज तिरंगाही आणि जसा आम्हाला तिरंगा प्यारा आहे.तसा आम्हाला आमचे संविधान ही प्यारे असू द्या.

राष्ट्रभक्ती ही केवळ स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन यापुरती मर्यादीत ठेवु नका.तर ती राष्ट्र भक्ती तुमच्या नसानसात कुटकुट भरली असली पाहिजे.ती सदोदीत तुमच्या सोबत असली पाहिजे.केवळ 'झेंडा उँचा रहे हमारा' म्हणण्याला अर्थ नाही. केवळ भारत माता की जय म्हणण्याला अर्थ नाही.आम्ही भारतीय असल्याने भारत माता की जय म्हणणारच.म्हणायलाच हवे. तरीही आम्ही फितुरीसारखे वागतो याच देशात.रोज बनवलेले कायदे तोडून आम्ही आमच्या संविधानाचा रोजच अपमान करतो.रोजच वर्तमानपत्रावरुन लक्षात येतं की काय घडलं देशात आणि काय घडत आहे देशात?इथे तर रोजच शेतकरी आत्महत्या पाहायला मिळतात. अगदी कळस चढला आहे या आत्महत्यांनी.रोजच बलत्कार घडतात देशात कुठे ना कुठे?अन् रोजच मारल्या जातात येथील देशवासीयांच्या भावना.आमचेच भाऊबहिण रोजच फितुरीसारखे वागतात या देशात.रोजच फितुरीने आमच्या देशातील संभाजी मारले जातात.रोजच अफजलखानासारखा पाकिस्तान डाव रचतो.रोजच कित्येक आमच्या सैनिकांना मराठ्यांसारखे देशाच्या सीमेवर मरावे लागते.अन् रोजच आमच्याच नकाशातील भाग दुस-या देशाच्या नकाशात जोडले जातात.तरीही आमचे नेते मौन बाळगतात.त्यांच्यासमोर शरणागती पत्करतात.चर्चा करु म्हणतात.ते चर्चेला ऐकत नाही. अंतरराष्ट्रीय कायद्याला मानत नाहीत.

भारतीय नेते भाषणापुरते ठीक आहेत.पण प्रत्यक्षात वागतांना त्यांना देशाचं काही घेणं देणं नाही असं जाणवतं. केवळ चर्चा करुन,अहिंसा अहिंसा करुन देशाला न्याय मिळणार नाही.तर देशाला न्याय मिळवून द्यायचे झाल्यास युद्ध स्तरावर लढायला हवं.काश्मीरचे रोजचे होणारे हत्यासत्र रोखले पाहिजेत.अरुणाचल चा जो भाग चीनच्या नकाशात दिसतो. तो भाग आपण अंतरराष्ट्रीय न्यायालयात सनदशिर मार्गाने लढून मिळवला पाहिजे.आम्ही फक्त लढणे विसरलो.शत्रुला मित्र समजायला लागलो.पण शत्रु आपल्याला मित्र समजत नाही.ते हिन्दी चीनी भाई भाई म्हणत ते कुरघोडी करतात.बाबरासारखे व इंग्रजासारखे या देशात शिरकाव करतात आणि अख्खा देश पोखरुन टाकतात.आम्हालाच गुलाम बनवू पाहतात आणि मग अत्याचार.

मित्रांनो आज चीनचा माल देशात येत आहे.सरेआम विकला जात आहे.आम्हीही स्वखुशीनं तो माल विकत घेतो.तसेच देशात वागतांना आम्ही आमच्याच आईबहिणीची इज्जत लुटतो. न्यायपालिकेतून आरोपींना बाइज्जत मोकळं केलं जातं.कधी वय लहान असल्याचा हवाला देत.तर कधी बलत्कार पिडीता तिथे गेलीच कशी याचा हवाला देत.कधी खुन होतो.लहान लहान गोष्टीसाठी.पण तेही न्यायालयातुन मोकळे होतात. कधी नापीकी म्हणून तर कधी सरकारी रसद मिळते म्हणून या देशात आत्महत्या.......या देशातील तमाम झेंडा ऊँचा म्हणणा-यावर कलंक आहे.आमचे आमच्या देशात स्वार्थासाठी भांडणे आमच्याच देशाला गुलाम करणारे तत्व आहे.

त्या तत्वाचा त्याग केल्याशिवाय आम्हाला आमचा देश सुधारता येणार नाही. आमचा देश महान आहे.असे आम्ही रोजच म्हणतो.पण त्या देशाला महान बनविण्यासाठी आमचे आपापसातील भांडणे योग्य नाही.आमच्या देशातील नागरीकांनी परकियांचा माल घेणे योग्य नाही.आमच्या देशातील कोणत्याही महिलेवर बलत्कार करणे योग्य नाही.तसेच आदर्श नागरिकत्वाचे पैलू न वापरता झेंडा उँचा म्हणण्याचा जयघोषही करणे योग्य नाही.त्याने देश महान बनणार नाही.

**अंकुश शिंगाडे**
**९३७३३५९४५०**

# संवेदनशील मनाचे बहुआयामी व्यक्तिमत्व डॉ अनिल अवचट

मुक्तांगणचे संस्थापक जेष्ठ समाजसेवक, पत्रकार, चित्रकार, प्रसिद्ध लेखक, बाल साहित्यकार डॉ अनिल अवचट ( बाबा ) यांची काल म्हणजे २७ जानेवारी रोजी चौथी पुण्यतिथी होती. चार वर्षापूर्वी म्हणजे २७ जानेवारी २०२२ रोजी अनिल अवचट यांचे वयाच्या ७८ व्य वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले होते. त्यांच्या निधनाने एक बहुआयामी, संवेदनशील व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ अनिल अवचट यांचा जन्म २६ ऑगस्ट १९४४ रोजी पुणे जिल्ह्यातील ओतूर या गावात झाला. लहानपणापासून अभ्यासात हुशार असणाऱ्या अनिल अवचट यांनी पुणे शहरातील बी जे मेडिकल कॉलेजमधून एम बी बी एस चे शिक्षण पूर्ण केले. कॉलेज जीवनात असताना त्यांनी अनेक चळवळीत भाग घेतला. युवक क्रांती दलाचे ते सक्रिय कार्यकर्ते होते. डॉ अनिल अवचट हे पेशाने पत्रकार आणि लेखक होते.



आपली लेखणी त्यांनी कायमच सामान्य जनतेच्या हितासाठी वापरली. डॉ अनिल अवचट हे स्वतः पत्रकार होते तरी त्यांनी पत्रकारितेतील व्यावसायिकतेला नेहमीच नकार दिला. त्यांनी आपली पत्रकारिता नेहमीच गरिबी, भ्रष्टाचार, अन्यायाचे बळी असलेल्या जनतेच्या हितासाठी वापरली. डॉ अनिल अवचट यांनी गरीब, मजूर, दलीत, वंचित, भटक्या, विमुक्त जाती जमाती, वेश्या यांच्या प्रश्नांविषयी विपुल लेखन केले. विविध प्रश्नांवर लढा देताना आपले आयुष्य एखाद्या प्रश्नांसाठी खर्च करणाऱ्या कार्यकर्त्यांविषयीही त्यांनी लेखन केले. १९६९ साली त्यांचे पहिले पुस्तक प्रकाशित झाले.

त्या पुस्तकाचे नाव पूर्णिया असे होते. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. त्यांची एकूण २२ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांचे लेखन प्रेरणादायी होते. तरुण लेखकांचे ते प्रेरणास्रोत होते. तरुण लेखकांना मार्गदर्शन करण्यात ते नेहमीच पुढे असत. डॉ अनिल अवचटांच्या लिखणाप्रमाणेच त्यांचे सामाजिक कार्यही प्रेरणादायी आहे. डॉ अनिल अवचट हे पुण्यातील मुक्तांगण वयसनमुक्ती केंद्राचे संचालक होते. त्यांनी आपल्या पत्नी डॉ सुनंदा अवचट यांच्या सहकार्याने व्यसनमुक्तीची शोधलेली अनोखी पद्धत ही जगभरातील अनेक व्यसनमुक्ती केंद्रात वापरली जाते.

मुक्तांगणच्या माध्यमातून त्यांनी हजारो तरुणांना व्यसनमुक्त केले आहे. व्यसनमुक्ती क्षेत्रात त्यांचे कार्य अतुलनीय असे आहे. डॉ अनिल अवचट हे केवळ लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते नव्हते तर एक उत्तम कलाकारही होते. त्यांची चित्रे, लाकडातील शिल्पे, ओरिगामी, छायाचित्रे, बासरी वादन यातून त्यांच्या अंगभूत कलांची ओळख होते. सामाजिक कार्यासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. डॉ अनिल अवचट यांची पुस्तके सलग तीन वर्ष महाराष्ट्र शासनाने सर्वोत्कृष्ट पुस्तके म्हणून जाहीर केली आहेत.

अमेरिकेतील ओहीओ प्रांतात झालेल्या आंतरराष्ट्रीय लेखकांच्या संमेलनात त्यांच्या साहित्याचा गौरव करण्यात आला होता. सातारा येथील न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे प्रतिष्ठान तर्फे दिला जाणारा सामाजिक न्याय पुरस्कार ( २००७ ), साहित्य अकादमीतर्फे प्रथम बाल साहित्य पुरस्कार (२०१० ), महाराष्ट्र राज्य पुरस्कार ( २०११ ) तसेच त्यांच्या मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राला पुल कृतज्ञता पुरस्कार (२०१५ ) अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरिवण्यात आले आहे. त्यांच्या निधनाने संवेदनशील मनाचे बहुआयामी व्यक्तिमत्व हरपले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. डॉ अनिल अवचट यांना चौथ्या पुण्यतिथीनमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार,पुणे**
**९९२२५४६२९५**

सदरचे दैनिक मालक, प्रकाशक, मुद्रक व संपादक श्री. चिदानंद अ. चाबुकस्वार यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस, सर्वे नं. ३४ / २, रामदेव वेअर हाऊस प्रा. लि., हैदराबाद रोड, सोलापूर - ४१३००५ येथे छापून आसरा सोसायटी, आसरा चौक, होटगी रोड, सोलापूर येथे प्रकाशित केले. मालक, प्रकाशक व संपादक : श्री.चिदानंद अ. चाबुकस्वार, मो.९१४५६१२८७०, व्हॉटसअप : ९१७५५९६७४७ ई-मेल : dailysiddheshwarnagari@gmail.com , RNI NO. : MAHMAR52944, या अंकातील मजकूराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# स्वेरीमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**पंढरपूर:** गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या भव्य प्रांगणात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

स्वेरीचे संस्थापक व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यातील राज इंडस्ट्रिजचे टॅलेंट लर्निंग अँड ऑर्गनायझेशन डेव्हलपमेंटचे व्यवस्थापकीय सहसंचालक योगेश खताळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. भारतमातेच्या प्रतिमा पूजनाने या कार्यक्रमाला सुरवात झाली. स्वेरीचे विद्यार्थी आदित्य मेडशिंगकर, मुग्धा कोरे, वैष्णवी आवताडे, प्रितम बढे यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त केलेल्या भाषणांतून भारतातील विविध क्षेत्रातील वस्तुस्थिती, युवकांवरील जबाबदारी, भारतीय संस्कृती, शिक्षण, आरोग्य, क्रीडा आदी विषयावर उत्तम पद्धतीने विचार मांडले. जगातल्या अनेक देशामध्ये फिरून आल्यावर मला भारतात एक वेगळी सकारात्मकता जाणवते. आज आपण एक तरुणांचा देश आहोत. मानवासाठी जगाला अजून चांगले स्थान बनवण्यासाठी आपण भारतीय लोक अतिशय चांगले योगदान देऊ शकतो.' प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विविध विभागांच्या संशोधन पत्रिकांचे व 'स्वेरीयन' या त्रैमासिकाचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले तसेच 'विकसित भारत २०४७' या अभियानाचा एक भाग म्हणून 'समर्थ विद्यार्थी, समर्थ भारत' या उपक्रमाअंतर्गत सर्व विद्यार्थी व उपस्थितांना शपथ देण्यात आली. यावेळी सचिव डॉ. सुरज रोंगे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एम.पवार, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस. व्ही. मांडवे, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस.मठपती,

# क्रेडाई सोलापूरतर्फे ३० जानेवारीपासून प्रॉपर्टी एक्स्पो

**सोलापूर** : क्रेडाई सोलापूर तर्फे प्लॉट, फ्लॅटस्, रो हाऊझेस्, बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स, वित्तीय संस्था आदींचे प्रदर्शन यंदा दि. ३० जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान नॉर्थकोट हायस्कुल मैदानावर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती क्रेडाई सोलापूरचे अध्यक्ष अभिनव साळुंखे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

CREDAI SOLAPUR

या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार, दि. ३० जानेवारी रोजी माजी सनदी अधिकारी व मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी यांच्या हस्ते व सोलापूर जनता बँकेचे चेअरमन सुनील पेंडसे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी क्रेडाई नॅशनलचे सदस्य सुनिल फ रडे, क्रेडाई महाराष्ट्राचे उपाध्यक्ष शशिकांत जिद्दीम नी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सोमवार दि. २ फेब्रुवारी पर्यंत दररोज स. १० ते रात्रौ ८ दरम्यान सर्वांसाठी हे प्रदर्शन खुले असणार आहे. या प्रदर्शनाचे सोलापूर जनता सह बँक हे मुख्य प्रायोजक असून माऊली लँडमार्क व जेजेआरव्ही समर्थ प्रसाद हे सह प्रायोजक आहेत.'

यंदाच्या प्रदर्शनात सुमारे ६५ स्टॉल्स् असून सोलापूरातील क्रेडाई सभासदांचे विविध प्लॉटस्, फ्लॅटस्, बंगलोज, रो-हाऊसेस, कमर्शिअल कॉम्प्लेक्स् तसेच अनेक बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स, वित्तीय संस्था भाग घेत असून प्रदर्शनाच्या ठिकाणीच गृहकर्जाची माहिती ही मिळणार असल्याची माहिती या प्रदर्शनाचे समन्वयक आनंद पाटील यांनी दिली. सोलापूरकरांनी या प्रदर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. या प्रदर्शनात रविवार दि. १ फ ब्रुवारी रोजी क्रेडाई वुमन्स विंग व युथ विंग च्यावतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आल्याची माहिती दिली.

वुमन्स विंग व युथ विंग - क्रेडाई सोलापूर शाखेद्वारे क्रेडाई सोलापूर वुमन्स विंग व युथ विंगची स्थापना करण्यात आली असून बांधकाम व्यवसायात महिलांचा व युवकांचा सहभाग, प्रशिक्षण, शैक्षणिक दौरा सक्षमीकरण आदी कार्यक्रम हाती घेण्यात येत आहेत.

या पत्रकार परिषदेस दक्ष पटेल, संतोष सुरवसे, किशोर चंडक. गुरुराज येल्लटी, प्रदीप पिंपरकर, प्रियदर्शन शाह, समीर गांधी, नंदकिशोर मुंदडा, अभय सुराणा, सिध्देश्वर जोकारे, जनता बँकेचे विनायक दोनारके उपस्थित होते.

# एस. व्ही. सी. एस. प्रशालेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा





**सोलापूर**-एस.व्ही. सी. एस. हायस्कूल एमआयडीसी येथे भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनानंतर संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी शिक्षण संकुलातील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर उत्कृष्ट खडे व बैठे कवायत प्रकार सादर केले.

प्राथमिक, माध्यमिक व इंग्लिश मीडियम मधील विद्यार्थ्यांचे भाषणे झाली यावेळी बोलताना मुख्याध्यापक म्हमाणे म्हणाले, संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्ष, लोकशाही या तरतुदींचा प्रत्येक भारतीयांनी तंतोतंत आचरण केल्यास देशाची एकता अबाधित राहणार असल्याचे सांगितले. यावेळी मुख्याध्यापक म्हमाणे यांना जिल्हा कलाध्यापक संघाकडून आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार व कलाशिक्षक पंडित स्वामी यांना आदर्श कला शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल संचालक शशिकांत रामपुरे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर सुंदर नृत्य सादर केले. इंग्लिश मिडीयमच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर कराटे क्रीडा प्रकारचे प्रात्यक्षिक सादर केले. शेवटी विद्यार्थ्यांना गोड खाऊ देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील सर्व शिक्षक- शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# जनविकास क्रांती सेनेच्या वतीने प्रजासत्ताक दिन साजरी ; प्रजासत्ताक दिन चिरायू राहावे म्हणून भारत मातेला प्रार्थना

**सोलापूर**- २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन महाराष्ट्र कामगार सेना व जनविकास क्रांतीसेनेच्या वतीने राष्ट्रध्वज वंदन व विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आले आहे.

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त जनविकास क्रांती सेना पक्षाच्यावतीने कामगार सेना कार्यालय पद्मशाली चौक येथे सकाळी ९ , वाजता राष्ट्रध्वज वंदन जनविकास क्रांती सेनेचे प्रदेश अध्यक्ष विष्णू कारमपुरी (महाराज) यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले त्यानंतर शालेय विद्यार्थी



विद्यार्थिनींना खाऊ वाटप व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

त्यावेळी माध्यमांशी बोलताना कारमपुरी (महाराज) यांनी मा. बाबासाहेब आंबेडकरांनी या दिवशी दिलेल्या घटनेमुळे लोकशाही आपण अनुभवत आहोत लोकशाही निरंतर चिरायू राहो हीच भारत मातेला प्रार्थना असे म्हणाले सदर झेंडावंदन कार्यक्रमास विष्णु कारामपुरी (महाराज) यांच्यासह विठ्ठल कु-हाडकर , श्रीनिवास बोगा , प्रशांत जक्का , गुरुनाथ कोळी , श्रीकांत कुसुरकर , पप्पु शेख , हिरामणी मामड्याल , अंबुबाई मामड्याल , सविता दासरी , मनिषा कोमठी ,राणी दासरी , रमाबाई माटेटी आदी उपस्थित होते.

# प्रगतीची दिशा दाखविणारी ए आय प्रणाली स्वीकारावी; मल्लिनाथ कल्याणशेट्टी

## पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात प्रजासत्ताक दिनानिमित्त कार्यक्रम

**अक्कलकोट ;** कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, संगणक, मोबाईल, इंटरनेट, यंत्रे, रोबोट्स शिवाय सॉफ्टवेअरमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. विद्यार्थ्यांना देखील वैयक्तिक मार्गदर्शन, ऑनलाइन शिक्षण,मूल्यांकन यासाठी ए आय वापरले जात आहे, त्यामुळे ए आय प्रणाली मानवाच्या प्रगतीसाठी उपयुक्त असून तिचा स्वीकार केला पाहिजे,असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण कार्यक्रमात विद्यार्थ्यांची ए आय संदर्भात भाषणे झाली, त्यानंतर कल्याणशेट्टी बोलत होते.संस्था संचलित कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर आयोजित केलेल्या बौद्धिक

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा भिमराव साठे, संचालक महेश कापसे, प्राचार्य राजेंद्रसिंह



लोखंडे, माजी मुख्याध्यापक बापूजी निंबाळकर अशोक दंतकाळे , माजी पर्यवेक्षक शिवानंद पुजारी, खंडेराव घाटगे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, दिगंबर जगताप, पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे आदी उपस्थित होते.पुढे बोलताना ते म्हणाले की,आरोग्य क्षेत्रात रोगांचे निदान, शस्त्रक्रियेमध्ये रोबोट्सचा वापर. बँकिंग, शेअर बाजार, वाहतूक व्यवस्था, शेती, ई-व्यवहार, सोशल मीडिया आणि ग्राहक सेवा या सर्व ठिकाणी कृत्रिम बुद्धिमत्ता महत्त्वाची भूमिका बजावत आहे. त्यामुळे समाजाची प्रगती होत आहे माणसाला वेळखाऊ व धोकादायक असलेली कामे सहज करू शकते. तसेच मुळे नवीन संशोधन, तंत्रज्ञान विकास आणि नव्या रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत.प्रारंभी पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले प्रास्ताविक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले, सूत्रसंचलन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार दिगंबर जगताप यांनी मानले.

**ए आय प्रणाली विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक**

बौद्धिक कार्यक्रमात समर्थ पवार, वेदांती मसलेकर या विद्यार्थ्यांनी ए आय प्रणालीवर अभ्यासपूर्ण भाषणे झाली.

यावेळी इयत्ता ९ वी तील विद्यार्थिनी आदिवासी चौकोनी रिंगण नृत्य केले, त्याचे प्रेक्षकांनी कौतुक केले, यासाठी क्रीडा शिक्षक कुमार जाधव यांनी मार्गदर्शन केले.

**छोटया जाहिराती**

जाहिरीतीसाठी संपर्क- 9175596747

**व्यसनमुक्ती**

येथे व्यसनी व्यक्ती व्यसनमुक्त होऊन स्वच्छंदी जीवन जगण्यास सुरुवात करतात. नका कॅन्सरला आमंत्रण देऊ..दारू, अंमली पदार्थ ग्यारंटेड सुटण्यासाठी व्यसन+ टेन्शन+ भीती+ चिंता+ नैराश्य + हस्तकंप+ निद्रानाश १००% गॅरंटेड रिझल्ट डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र संपर्क : ९५ ५२ ६१ ९७ ५२ कॉल, व्हाट्सअप करा दारू अमली पदार्थ रामराम करा

**आमच्या वाचकांना विनम्र सूचना**

सिध्देश्वर नगरी

आमच्या सदरील वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील नमूद मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्या संबंधित आर्थिक व्यवहार करावा जाहिरातीमध्ये त्यांच्या उत्पादन व सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दैनिक सिद्धेश्वर नगरी वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दैनिक सिद्धेश्वर नगरी वृत्तपत्राचे प्रकाशक, मुद्रक संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**वाचकानीं शब्दकोड्याचे उत्तर ऑनलाईन पाहण्यासाठी गुगलवर Dainik Siddheshwar Nagari असे टाईप करून आमचा ऑनलाईन अंक पहावा..!**

## दैनिक सिद्धेश्वर नगरी महाशब्दकोडे 113



*आडवे शब्द:-* 1) पहिल्या वेळी; सर्वांत अगोदर; गणनात्क्रमात एक, 3) पत्रातील परिशिष्ट, 6) रात्रीच्या रात्रीत, 8) उदासीन; निर्विकार, 9) पटवारी, 11) छोटा, चपटा व चौकोनी पदार्थ, 13) ठिपका, 14) बांधा, 15) उठाठेव; व्यवस्थापन, 17) उपलब्ध, 18) मिळकत, 20) अचूक, 21) लाक्षणिक अर्थाने बङ्बाबोळ; कोणतेही सुषिरवाद्य, 23) अविलंब, 25) कसबी; निपुण, 27) गण-पती, 29) एक दुग्धजन्य गोड घट्ट खाद्य, 30) गुंडाळी.

*उभे शब्द:-* 2) एक भाषा, 3) घाई, 4) अशक्त, 5) स्पष्ट; चमकदार, 7) दशकंधर, 9) भगदाड, 10) खर्च, 12) अतिशय, 14) चोपडणे, 15) कच्च्या फळांचा रस, 16) पळपुटा, 18) अब्रू; प्रतिष्ठा, 19) पैसेखाऊ, 22) 'पूर्वी खेड्यापाड्यांतील लोक-वस्ती ×××× असायची', 24) लोकमान्यांचे शिरोभूषण, 26) असंस्कृत, 28) प्रेत.

*(उत्तर: पुढील अंकात)*

*मागील शब्दकोड्याचे उत्तर*

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खु | | ग | ज | ब | ज | | सं | के | त |
| श | | रो | ग | | व | | ख्या | त | |
| म | शी | द | | वि | ळ | खा | | न | स |
| स्क | | र | जा | | पा | स | ला | | का |
| री | म | | च | र | स | | ज | व | ळ |
| | ह | र | णे | | | फ | रा | र | |
| | त्त | | | अ | ग्र | णी | | पां | |
| अ | म | रा | व | ती | | | मा | गी | ल |
| र्धा | | जी | | त | ज | वी | ज | | द्व |

AMRITA BHASKAR NANDANWAR 9822568532

# भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते संपन्न

**सोलापूर :-** भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी दीर्घकालीन संघर्षानंतर स्वतंत्र झाला. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाला एक सुसंघटित, लोकशाहीवादी आणि न्याय्य व्यवस्था देणे ही मोठी जबाबदारी होती. यासाठी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटना स्वीकारण्यात आली आणि ती २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आणण्यात आली. ही राज्यघटना भारतीय लोकशाही प्रणालीचा दीपस्तंभ आहे, असे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

पोलीस परेड ग्राउंड येथे आयोजित भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक ग्रामीण अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, राज्य राखीव पोलीस बलाच्या समादेशक दिपाली



काळे, माजी आमदार नरसिंग मेंगजी, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे प्रमुख तसेच पदाधिकारी, स्वातंत्र्यसैनिक, ज्येष्ठ नागरिक, पालक, विद्यार्थी, पत्रकार व अन्य मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री श्री गोरे पुढे म्हणाले की, भारतीय लोकशाही प्रणालीचा दीपस्तंभ ठरलेली राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी लिखित संविधान आहे. घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांनी संविधान निर्मितीत बहुमोल योगदान दिले. संविधानाने आपल्याला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा वारसा दिला. प्रत्येक नागरिकाला समान अधिकार, धर्म स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि शिक्षणाचा हक्क दिला. त्यामुळे भारतातील लोकशाही ही जगातील सर्वात मोठी आणि सशक्त लोकशाही म्हणून ओळखली जाते, असे त्यांनी सांगितले.२६ जानेवारी १९५० रोजी भारताने लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केला. भारतीय संविधान अंमलात आले आणि नागरिकांना मूलभूत अधिकार प्राप्त झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाने स्वतःची दिशा ठरविली. विविधतेत एकता हा भारताचा आत्मा प्रजासत्ताक दिनाद्वारे अधोरेखित होतो. भारताचा प्रजासत्ताक दिन हा केवळ उत्सव नसून आपल्या लोकशाही मूल्यांचा, संविधानाचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा सन्मान आहे. आपण सर्वांनी मिळून देशाच्या प्रगतीसाठी योगदान देऊ या, असे आवाहन पालकमंत्री गोरे यांनी केले.

देशाची, राज्याची तसेच आपल्या जिल्ह्याची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी जागरूक नागरिक म्हणून आपण सर्वांनी एकत्रित येऊन काम करणे आवश्यक आहे. संविधानाने दिलेल्या अधिकारांचा वापर करताना कर्तव्यांचे पालन करणे. सामाजिकता, बंधुता आणि एकात्मता जपणे. पर्यावरणाचे संरक्षण करणे. शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे. लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे. पंढरपूरची वारी मुळे जिल्ह्याला विशेष ओळख मिळाली असून पंढरपूर, अक्कलकोट, सिद्धेश्वर मंदिर, ऐतिहासिक किल्ले आणि नैसर्गिक स्थळे

जिल्ह्याला पर्यटनाच्या नकाशावर महत्वपूर्ण स्थान देतात, असेही श्री. गोरे यांनी सांगितले. प्रारंभी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर येथे उपस्थित असलेले ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, ज्येष्ठ व मान्यवर नागरिक पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि पत्रकार बांधवांची सदिच्छा भेट घेऊन प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पालकमंत्री श्री गोरे यांनी भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेचे वाचन केले. त्यानंतर याप्रसंगी तंबाखू मुक्ती, कुष्ठरोग मुक्ती तसेच बालविवाह प्रतिबंध बाबत सर्वांना शपथ देण्यात आली.तत्पूर्वी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी परेड कमांडर प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक राहुल आत्राम यांच्या समवेत परेड निरीक्षण केले, त्यानंतर परेड चे संचलन राहुल आत्राम यांच्या नियंत्रणाखाली पार पडले. परेड पथ संचलनात पोलीस विभाग, शहर पोलीस विभाग महिला व पुरुष पथक, राज्य राखीव पोलीस दल महिला व पुरुष, शहर पोलीस दलाच्या शीघ्र प्रतिसाद दल, होमगार्ड पथक, एनसीसी पथक बॉम्बशोधक पथक, श्वान पथक, आपत्ती व्यवस्थापन बचाव दल पथक आदींचा समावेश होता.

**पुरस्कार व सन्मान –**

पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर अंतर्गत एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद रोहिदास वाघमारे तसेच शहर वाहतूक शाखा दक्षिणचे पोलीस उपनिरीक्षक राजकुमार टोळनुरे यांना पोलीस दलात उत्कृष्ट कार्य व सेवा बजावल्याबद्दल राष्ट्रपती पदक प्राप्त झालेले असून यांचा सत्कार पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आला.तर पोलीस अधीक्षक कार्यालय सोलापूर ग्रामीण अंतर्गत कार्यरत अधिकारी कर्मचारी यांनी विविध क्रीडा प्रकार तसेच गुन्ह्यांचे तपास पूर्ण करण्यात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये श्रीमती अश्विनी दिलीप गाजरे, प्रसाद छगन मांढरे, शिवानंद सौदागरे, दत्तात्रय शंकर बोरिगिड्डे, नागेश राजाराम बनकर, नारायण विनायकराव पवार, नागनाथ जयराम खुणे आदींचा समावेश आहे.

# आदिवासी कोळी समाजाचा एक फेब्रुवारीला वधू-वर मेळावा

**सोलापूर :** बटगेरी सामाजिक प्रतिष्ठान सोलापूर संचलित आदिवासी कोळी समाजाचा १४ वा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी ५ वाजेपर्यंत मुळे सभागृह, हरिभाई देवकरण प्रशाला प्रांगण, सोलापूर येथे आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष शंकर बटगेरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या मेळाव्यात समाजाच्या इयत्ता १० वी व १२ वी मध्ये विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

या मेळाव्यात आदिवासी कोळी समाजासह समाजाच्या इतर सर्व पोटजातीच्या समाजबांधवांची प्रथम वधु-वर नोंदणी तसेच घटस्फोटीत / घटस्फोटीता, विधूर/विधवा यांची देखिल नोंदणी करण्यात येवून सेवा देण्यात येत आहे. तसेच नुकतेच झालेल्या नगर परिषद व महानगरपालिकेमध्ये नगरसेवक व नगरसेविका म्हणून निवडून आलेल्या समाजातील नगरसेवकांचा सत्कार करण्यात येणार आहे. मेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे विष्णुपंत कोळी (मुंबई), माजी आमदार प्रकाश यलगुलवार, उज्ज्वला साळुंके इत्यादी प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत.

मेळाव्यासाठी महाराष्ट्रातील, तेलंगणा, आंध्र प्रदेश व कर्नाटकातील कोळी समाज वधु-वर व पालक उपस्थित राहणार आहेत. कोळी समाजातील गरजू वधु-वर पालकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात येत आहे.

या पत्रकार परिषदेला संस्थेचे सचिव नागनाथ दोरणाळे, खजिनदार शिवलिंग कोळी, शिवपुत्र जमादार, विश्वनाथ बिदरकोटे, हनुमंत मोतीबने, मनीष कोळी आदी उपस्थित होते.

# प्रशासकीय इमारती मध्ये अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या हस्ते ध्वजारोहण



**सोलापूर :** भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिनानिमित्त अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात सकाळी ७.४५ वाजता ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था किरण गायकवाड, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्न धान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

प्रारंभी अप्पर जिल्हाधिकारी गणेश निराळी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, त्यानंतर राष्ट्रगीत व राज्य गीत गायन झाले. त्यानंतर अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी उपस्थित अधिकारी कर्मचारी व नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# 'सारेगाना' कार्यक्रमाचे एक फेब्रुवारीला आयोजन

**सोलापूर :** गायक, लेखक, दिग्दर्शक अश्रफ खान यांचा सारेगाना या नावाने तिसरा गाण्यांचा कार्यक्रम येत्या दि. १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे आयोजित केला आहे, अशी माहिती अश्रफ खान व विवेक कन्ना यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या शोमध्ये भारतीय चित्रपट संगीतकार आर. डी. बर्मन यांनी संगीतबद्ध केलेले युगलगीत सादर होणार आहेत. अश्रफ खान यांनी यापूर्वीही हुतात्मा स्मृती मंदिर येथे २ कार्यक्रम प्रस्तुत केले आहेत. या शोमध्ये सायली साठे, रेणुका म्हमाणे, स्मिता, चैताली क्षीरसागर, प्रतिमा बेनगी, अश्रफ खान, विवेक कन्ना, अविनाश चिल्ला, बसवराज कोळकुरे, केशव गणपा, गुरु हिबारे, नागोजी संगमनाथ, राजेश कुलकर्णी, अतुल जम्मा, अनिल पतंगे, धनराज थळंगे, सुधाकर मिरजकर, सुहास माने हे आपली कला सादर होणार आहे.

या पत्रकार परिषदेला स्मिता, आरोही जमादार, केशव गणपा आदी उपस्थित होते.

# सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न



**सोलापूर :** सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, शंकरनगर, अकलूज या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रविण ढवळे यांनी दिली.

या प्रसंगी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना शंकरनगर अकलूज चे व्हाईस चेअरमन शंकरराव रामचंद्र माने देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यावेळी त्यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा थोडक्यात सांगितला व विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन स्वताचे, महाविद्यालयाचे आणि देशाचे नाव उंचवावे व देश प्रगतीपथावर नेण्यासाठी कार्यरत रहावे असे सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ प्रविण ढवळे यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले. त्यामध्ये त्यानी महाविद्यालयाच्या प्रगतीचा माहिती थोडक्यात सांगितली व सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी महाविद्यालय विकास समिती सदस्य वसंत जाधव साहेब, मोहन लोंढे साहेब तसेच डॉ. भीमराव भांगे प्राचार्य डॉ. प्रविण ढवळे, महाविद्यालय समन्वयक, कार्यालयीन अधिक्षक, सर्व विभागाचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. भारती चंदनकर यांनी केले.



अक्कलकोट रोडवरील नामांकित एस व्ही सी एस प्रशालेत २६ जानेवारी या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शाळेच्या पटांगणात किंवा प्रांगणामध्ये विद्यार्थ्यांमार्फत आकर्षक कवायती आणि कसरती करण्यात आल्या त्याप्रसंगी टिपलेले छायाचित्र..!

जिल्हा परिषद/पंचायत समिती निवडणूक
प्रचारासाठी लागणारे सर्व साहित्य एकाच ठिकाणी मिळेल.
सोशल मीडिया (फेसबूक/INSTA)
पॅम्पलेट | वोटर स्लिप | वोटर APP.
स्टिकर | डेमो मशीन | स्लिप प्रिंटर
सर्व प्रकारचे मतदार यादी
WHATAPP MESSAGE
VOICE CALL AVAILABLE
-संपर्क-
8208525515

शूरवीर जवान !... दुश्मनोंकी जान लेते है !!...
बेवकुफ व्यसनाधीन !... अपनोंकी जान लेते है !!...
गॅरंटीने सर्व व्यसन
दारु सोडवा
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
अपॉईटमेंट 9552619752



जिल्हा परिषद व पंचायत समिती
निवडणूक प्रचारासाठी लागणारे
शेले | झेंडे | बॅचेस | टोपी | बिल्ले | डेमो मशीन
पिसे झेंडेवाले
२४, रेल्वे लाईन, हॉटेल निसर्गजवळ, रामलाल चौक, सोलापूर
M - 9823705050

गड्डा यात्रेतील आमच्या स्टॉलला अवश्य भेट द्या
एकदा खाल तर पुन्हा पुन्हा याल..!
अखिल भारतात नावाजलेला,अहिल्यानगरचा सुप्रसिध्द !
रामप्रसाद चिवडा
SINCE 1963
सिध्देश्वर गड्डा यात्रा,सोलापूर-२०२६



6821,चितळे रोड,अहिल्यानगर-414001 | फोन. (0241)2343412 / 9422234711